# शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड

मुख्य कार्यालय: पोकर्णा कॉम्पलेक्स, नवा मोंढा, नांदेड

## एस.एम.एस.अलर्ट सुविधा फॉर्म

प्रती,

शाखा व्यवस्थापक,

शाखा : ________________________

मी श्री/सौ. ______________________________________________________________

बँकेची एस.एम.एस.अलर्ट सुविधा घेण्याकरीता आपल्या शाखेत अर्ज करीत आहे. या संदर्भातील मागे दिलेल्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असुन त्या सर्व अटी मला मान्य आहेत. तरी व्यवहार व विज्ञापण (Transactional SMS & Promotional SMS) बाबत एस.एम.एस.अलर्ट सुविधा ही माझ्या वैयक्तिक उपभोगाकरीता घेत असुन मला ती मिळावी ही विनंती.

### ग्राहक नोंदणी

| | |
|---|---|
| ग्राहक कमांक (ID) | शाखा कोड : |
| फर्मचे नांव : | व्यवसाय सुरु केल्याचा दिनांक : |
| ग्राहकाचे नांव : | जन्म तारीख : |
| खाते कमांक : | |
| संपर्क कमांक : | |

ग्राहकाची सही

### शिफारस

सदर ग्राहकाने दिलेली माहिती तपासली असुन ती अचूक आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे ग्राहकास एस.एम.एस. अलर्ट सुविधा देण्याबाबत शिफारस करण्यात येते.

हिशोबनीस/शाखा व्यवस्थापक

## एस.एम.एस.अलर्ट बँकींगसाठी खालील प्रमाणे अटी व शर्ती

१. बँकेचा कुठलाही खातेदार हा या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र आहे.

२. एस.एम.एस. अलर्ट बँकींग सुविधा प्राप्त करणे करीता खातेदारास त्याचे खाते असलेल्या शाखेतुन त्या संबंधीची आवश्यक ती माहिती बँकेस देणे बंधनकारक आहे.

३. खाते बंद झाल्यावर खातेदाराची एस.एम.एस.अलर्ट सुविधा आपोआप बंद होईल.

४. ग्राहकांना केवळ एका मोबाईल नंबरवरच ही सेवा मिळू शकेल.

५. ग्राहकांच्या मोबँईलवर येणाऱ्या सर्व संदेशांची व त्यातुन निर्माण होणाऱ्या कूठल्याही अडचणींची व त्याच्या परिणामांची तसेच सर्व अनधिकृत संदेशांची जबाबदारी ग्राहकांची राहील.

६. एस.एम.एस.अलर्ट सुविधा पुरविणे करीता भारतात उपलब्ध असलेल्या आवश्यक व योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब करणे तसेच बँक ग्राहकांना पाठविल्या जाणाऱ्या सर्व अधिकृत संदेशाची गोपनीयता व सुरक्षितता बाळगणे तसेच बाहेरील कुठल्याही अनधिकृत व्यवहारास शिरकाव न करु देणे या संदर्भातील योग्य ती काळजी वेळोवेळी घेण्यात येईल याची खात्री बँक ग्राहकांना देते.

७. बँकेद्वारे प्राप्त झालेल्या सर्व संदेशांच्या गोपनीयतेची जबाबदारी ही पुर्णतः ग्राहकाची राहील.

८. ग्राहकांना पूर्वसुचना न देता वेळोवेळी एस.एम.एस.अलर्ट सुविधे संदर्भातील अटी व शर्तीमधील बदल, आकारण्यात येणाऱ्या शुल्कांमधील बदल तसेच ते लागू करण्या संदर्भातील पुर्णतः अधिकार बँकेस राहतील व यास ग्राहकांची पुर्वसंमती असेल.

९. विविध ग्राहकांना विशिष्ट एस.एम.एस. अलर्ट सेवा देण्याचे तसेच त्यास नविन सेवा देणे वा बंद करण्याबाबतचे सर्व अधिकार बँकेस राहतील.

१०. या सुविधेसंदर्भातील कुठल्याही आर्थिक नुकसानीकरीता ग्राहकास बँकेच्या संचालक, अधिकारी व कर्मचारी वर्गास जबाबदार धरता येणार नाही.

११. ग्राहकाचे गैरव्यवहार, गैरवर्तन वा गैरप्रकार आढळुन आल्यास कुठलीही पुर्वसूचना न देता त्याची एस.एम.एस.अलर्ट सुविधा बंद करण्यात येईल.

१२. बँकींग व्यवहारासंदर्भातील पाठविले जाणारे व्यवहार व विज्ञापण (Transactional SMS & Promotional SMS) बाबत एस.एम.एस.अलर्ट ग्राहकांना तत्काळ मिळणे हे मोबाईल सेवा पुरविणाऱ्या ऑपरेटरच्या तत्कालीन सेवा, नेटवर्क कनेक्टीव्हीटी इ. बाबींवर अवलंबून असते याची ग्राहकांनी दखल घ्यावी.

१३. एकदा बँकेच्या एस.एम.एस.अलर्ट सुविधेकरीता ग्राहकाने नोंदणी केल्यानंतर त्यास बँकेने ठरऊन दिलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असुन त्या समजल्या आहेत असे समजून ती सुविधा सुरु करुन देण्यात येईल.

ग्राहकाची सही

नांव ______________________________

पत्ता ______________________________

______________________________